# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सामान्य प्रशासन विभाग
### परिपत्रक

क्रः एमपीएम/दोन/7702 दि.02.04.2016

विषय :- महानगरपालिका कर्मचा-यांविरुध्द खात्यांतर्गत चौकशीचे आदेश देण्याविषयी तसेच त्यांना शिक्षा फर्माविण्याविषयी अधिकार प्रदान करण्याबाबत.

संदर्भः- 1. परिपत्रक क्र.एमओएम / 7549 / दि. 16.01.1992
2. परिपत्रक क्र.एमपीएम / 5480 / दि. 10.04.2002

मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 83 (3) मधील तरतुदीनुसार शिक्षा देण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये महानगरपालिका कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगविषयक चौकशीचे आदेश देण्याचे व त्यांना शिक्षा फर्माविण्याचे अधिकार खाते प्रमुख, उप आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात अंशतः बदल करुन सोबतच्या तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कर्मचा-यांविरुध्द चौकशीचे आदेश देण्याचे व त्यांना शिक्षा फर्माविण्याचे सुधारित अधिकार खाते प्रमुख, उप आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. सदर तक्त्यामध्ये विविध संज्ञाद्वारे दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये येणारी पदे परिशिष्ट अ मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

शिस्तभंगविषयक कारवाईच्या प्रयोजनासाठी सोबतच्या तक्त्यात **स्तंभ क्र. 07** मध्ये दर्शविलेल्या अधिका-यांना सदर तक्त्यांच्या **स्तंभ क्र. 02** मध्ये दर्शविलेल्या अधिकारी / कर्मचारी गट यांच्यासाठी नियुक्ती प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

घन कचरा व्यवस्थापन खात्यातील कर्मचा-यांची संख्या, कर्मचा-यांच्या सततच्या व मोठ्या प्रमाणावरील अनधिकृतरित्या गैरहजर राहण्यामुळे मोठ्या प्रमाणावर उद्भवणारी खात्यांतर्गत चौकशीची प्रकरणे लक्षात घेता सदर प्रकरणे कमीत-कमी वेळात निकालात काढण्यासाठी सदर खात्यातील पर्यवेक्षक / मुख्य लिपिक या पदांच्या वेतनश्रेणीतील व त्यापेक्षा निम्नसंवर्गातील कर्मचा-यांच्या चौकशीचे आदेश देण्याच्या प्रयोजनासाठी सदर खात्यातील संबंधित उप प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) / मुख्य पर्यवेक्षक यांना खाते प्रमुख समजण्यात यावे.

सोबतच्या तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे अधिकारी / कर्मचा-यांना शिक्षा फर्माविण्याविषयीच्या

प्रकरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

सर्व खातेप्रमुख / सहाय्यक आयुक्त यांनी उपरोक्त निदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (प्रभाकर वाघमारे) | (सुधीर नाईक) | (संजय देशमुख) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अति.आयुक्त (प.उ.) |

**प्रकअ/03/सर्वसा** — **क्र. एमपीएम/दोन/7702**

**2016-2017** — **दि. 02.04.2016**

प्रत - ---------------------------------------------------------------------यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**सह-प्रमुख कर्मचारी अधिकारी (एमपीएम)**
**यांजकरिता**

J. 23746. (2)

महानगरपालिका अधिकारी / कर्मचा-यांना शिक्षा देण्यासंबंधात असलेले अधिकार, मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 68 खाली अतिरिक्त आयुक्त/उप आयुक्त/ संचालक/खातेप्रमुख यांना देण्यात आलेले अधिकार

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी गट | नियुक्ती करणारे प्राधिकरण / प्राधिकारी | खात्यांतर्गत चौकशीचे आदेश देणारा प्राधिकारी | निलंबित करण्याचे आदेश देण्यास सक्षम प्राधिकारी | मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 83(3) अन्वये किरकोळ शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी | मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 83(1) अन्वये जबर शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी/ प्राधिकरण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 54अ, 55, 56अ, 74, 75, 76अ, 76ब, 77, 78अ, 78क, 78ड, 78ई अन्वये नियुक्त केलेले अधिकारी व संचालक (वै.शि. व प्र.रु.) | महानगरपालिका | महानगरपालिका आयुक्त | महानगरपालिका आयुक्त (★) | महानगरपालिका आयुक्त | महानगरपालिका | (★) मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 83(2)(ब) मधील तरतूदींनुसार असे प्रत्येक निलंबन व त्याबाबतची कारणे महानगरपालिकेस कळविणे आवश्यक असून निलंबनाच्या तारखेपासून 6 महिन्यांच्या आत महानगरपालिकेने त्यास पुष्टी दिली नाही तर असे निलंबन संपुष्टात येईल. |
| 2 | अधिष्ठाता, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्रपाठक, प्रमुख अभियंता, करनिर्धारक व संकलक, प्रमुख अग्निशमन अधिकारी | महानगरपालिका | संबंधित अतिरिक्त आयुक्त | महानगरपालिका आयुक्त | संबंधित अतिरिक्त आयुक्त | महानगरपालिका आयुक्त (#) | # मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 83(2)(क) मधील तरतूदींनुसार काढून टाकणे/ बडतर्फ करणे या शिक्षा फर्माविण्यापूर्वी स्थायी समिती / शिक्षण समिती (प्रकरणानुसार) पूर्व मंजूरी आवश्यक आहे. |

P.T.O.....

I. 23746 (3)

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | उपरोक्त अनु.क्र.1 ते 2 मधील अधिकारी वगळता कार्यकारी अभियंता व त्याच्या समकक्ष व त्यापेक्षा उच्च वेतनश्रेणीतील खातेप्रमुख, सहायक आयुक्त व गट-अ मधील इतर अधिकारी | महानगरपालिका | संबंधित अतिरिक्त आयुक्त | संबंधित अतिरिक्त आयुक्त | संबंधित उप आयुक्त/ संचालक(अ.से.व प्र.)/ संचालक (वै.शि. व प्र.रु.) | स्थायी समिती/ शिक्षण समिती (प्रकरणानुसार) @ | @ मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 83(2)(क) मधील तरतूदींनुसार काढून टाकणे / बडतर्फ करणे या शिक्षा फर्माविण्यापूर्वी स्थायी समिती / शिक्षण समिती (प्रकरणानुसार) पूर्व मंजूरी आवश्यक आहे. |
| 4 | वर्ग-2 (गट-ब) मधील अधिकारी<br>GRP 4200 to 5400 | महानगरपालिका आयुक्त | कार्यकारी अभियंता किंवा त्यापेक्षा उच्च वेतनश्रेणीतील संबंधित खातेप्रमुख/ संबंधित सहाय्यक आयुक्त | संबंधित सह आयुक्त/ उप आयुक्त/ संचालक (अ.से.व प्र)/ संचालक (वै.शि.व प्र.रु.) प्रमुख अभियंता यांच्या वेतनश्रेणीतील संबंधित खातेप्रमुख / संबंधित अधिष्ठाता/ संबंधित सहाय्यक आयुक्त | कार्यकारी अभियंता किंवा त्यापेक्षा उच्च वेतनश्रेणीतील संबंधित खातेप्रमुख/ संबंधित सहाय्यक आयुक्त | संबंधित सह आयुक्त/ उप आयुक्त/ संचालक (अ.से.व प्र.)/ संचालक (वै.शि. व प्र.रु.) | |

P.T.O....

J. 23746. (4)

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | वर्ग-3 (गट-क) मधील कर्मचारी | महानगरपालिका आयुक्त | कार्यकारी अभियंता किंवा त्यापेक्षा उच्च वेतनश्रेणीतील संबंधित खातेप्रमुख / संबंधित सहाय्यक आयुक्त | संबंधित सह आयुक्त/ उप आयुक्त/ संचालक (अ.से.व प्र.)/ संचालक (वै.शि.व प्र.रु.)/प्रमुख अभियंता यांच्या वेतनश्रेणीतील संबंधित खातेप्रमुख/ अधिष्ठाता/ संबंधित सहायक आयुक्त | कार्यकारी अभियंता किंवा त्यापेक्षा उच्च वेतनश्रेणीतील संबंधित खातेप्रमुख / संबंधित सहाय्यक आयुक्त | संबंधित सह आयुक्त/ उप आयुक्त/ संचालक (अ.से.व प्र.)/ संचालक (वै.शि.व प्र.रु.)/प्रमुख अभियंता यांच्या वेतनश्रेणीतील संबंधित खातेप्रमुख/ अधिष्ठाता/ संबंधित सहायक आयुक्त | |
| 6 | वर्ग-4 (गट-ड) मधील कर्मचारी | महानगरपालिका आयुक्त | कार्यकारी अभियंता किंवा त्यापेक्षा उच्च वेतनश्रेणीतील संबंधित अधिकारी | कार्यकारी अभियंता किंवा त्यापेक्षा उच्च वेतनश्रेणीतील संबंधित अधिकारी | कार्यकारी अभियंता किंवा त्यापेक्षा उच्च वेतनश्रेणीतील संबंधित अधिकारी | कार्यकारी अभियंता किंवा त्यापेक्षा उच्च वेतनश्रेणीतील संबंधित अधिकारी | |

टिप : 1) परिपत्रक क्र. एमपीएम/दोन/6670 दि. 03.05.2012 अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेतील पदांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. 2) निवृत्त कर्मचाऱ्यांना शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन 1953 च्या नियम क्र. 5(1)(अ) मध्ये विहित केलेले आहेत.

| सही /- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|
| दि.06.11.2015 | दि.03.12.2015 | दि.28.01.2016 | दि.02.02.2016 |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त आयुक्त(प.उ) | मनपा. आयुक्त |

BMPP. I. 23746. 2016-17. 800 copy.

1300 to 8700

महानगरपालिका अधिकारी / कर्मचा-यांना शिक्षा देण्यासंबंधात असलेले अधिकार, मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 68 खाली अतिरिक्त आयुक्त/उप आयुक्त/ संचालक/खातेप्रमुख यांना देण्यात आलेले अधिकार

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी गट | नियुक्ती करणारे प्राधिकरण / प्राधिकारी | खात्यांतर्गत चौकशीचे आदेश देणारा प्राधिकारी | निलंबित करण्याचे आदेश देण्यास सक्षम प्राधिकारी | मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 83(3) अन्वये किरकोळ शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी | मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 83(1) अन्वये जबर शिक्षा देण्यास सक्षम प्राधिकारी/ प्राधिकरण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 54अ, 55, 56अ, 74, 75, 76अ, 76ब, 77, 78अ, 78क, 78ड, 78ई अन्वये नियुक्त केलेले अधिकारी व संचालक (वै.शि. व प्र.रु.) | महानगरपालिका | महानगरपालिका आयुक्त | महानगरपालिका आयुक्त (★) | महानगरपालिका आयुक्त | महानगरपालिका | (★) मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 83(2)(ब) मधील तरतूदींनुसार असे प्रत्येक निलंबन व त्याबाबतची कारणे महानगरपालिकेस कळविणे आवश्यक असून निलंबनाच्या तारखेपासून 6 महिन्यांच्या आत महानगरपालिकेने त्यास पुष्टी दिली नाही तर असे निलंबन संपुष्टात येईल. |
| 2 | अधिष्ठाता, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्रपाठक, प्रमुख अभियंता, करनिर्धारक व संकलक, प्रमुख अग्निशमन अधिकारी | महानगरपालिका | संबंधित अतिरिक्त आयुक्त | महानगरपालिका आयुक्त | संबंधित अतिरिक्त आयुक्त | महानगरपालिका आयुक्त (#) | # मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 83(2)(क) मधील तरतूदींनुसार काढून टाकणे/ बडतर्फ करणे या शिक्षा फर्माविण्यापूर्वी स्थायी समिती / शिक्षण समिती (प्रकरणानुसार) पूर्व मंजूरी आवश्यक आहे. |

P.T.O.....

I. 23746 (3)